असा.क्र.१२१ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२१/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

**प्राधिकृत प्रकाशन**

गुरुवार, नोव्हेंबर २२, २००७/अग्रहायण १, शके १९२९

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-अ

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ नोव्हेंबर २००७

### अधिसूचना

**भारतीय विद्युत नियम, १९५६.**

क्रमांक आयईएल. २००७/प्र. क्र. ७६/ऊर्जा-३—भारतीय विद्युत नियम, १९५६ च्या नियम १३३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीनुसार महाराष्ट्र शासन याद्वारे १० किलो वॉटपेक्षा जास्त क्षमता असणाऱ्या परंतु २०० किलोवॉट पेक्षा अधिक क्षमता नसलेल्या जनित्र संचाची स्थापना आणि चाचणी करण्याकरिता सोबत जोडलेल्या अनुसूचिद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या अटींच्या अधीन राहून सदर नियमाच्या नियम ४७ ए मधील तरतुदी लागू राहणार नाहीत असे निदेश देत आहे :—

### अनुसूची

(१० किलो वॉट पेक्षा अधिक परंतु २०० किलो वॉटपेक्षा अधिक क्षमता नसलेल्या जनित्र संचांची स्थापना व चाचणी करण्याकरिता भारतीय विद्युत नियम, १९५६ च्या तरतुदी लागू न करण्यासाठी अटी)



[ **किंमत :** रुपये ७.०० ]

(१) १० किलो वॅटपेक्षा अधिक परंतु २०० किलो वॅटपेक्षा अधिक क्षमता नसलेले जनित्र संच कार्यन्वित करण्याचा ज्याचा उद्देश आहे, अशा ग्राहकाचा किंवा धारकाचा संच मांडणीचा प्रभारी विद्युत अभियंता किंवा प्रकरणपरत्वे प्राधिकृत विद्युत ठेकेदार,–

(ए) (१) याने जनित्र संचाच्या सर्व आवश्यक त्या चाचण्या करणे व त्याच्या निष्कर्षाची नोंदणी करणे आवश्यक राहील.

(२) ज्या उद्देशाकरिता जनित्र संच वापरण्यात येणार आहे त्या उद्देशाकरिता सदरचे जनित्र संच सक्षम असेल याबद्दल त्याची स्वत:ची खात्री झाली पाहिजे.

(३) त्याने खंड (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या चाचणीच्या निष्कर्षासह आणि ज्या उद्देशाकरिता संच कार्यान्वित केला आहे त्या उद्देशाकरिता सदरचे जनित्र संच सक्षम असल्याच्या स्वाक्षांकित प्रमाणपत्रासह कार्यान्वित केलेल्या संचमांडणीच्या परवानगीसाठी विद्युत निरीक्षकाकडे अर्ज सादर केला पाहिजे.

**किंवा**

(बी) वरीलप्रमाणे परवानगीकरिता अर्ज केल्यानंतर संच कार्यान्वित करावा आणि संच कार्यान्वित केल्याचा दिनांक निरीक्षकाला तात्काळ लेखी कळवावा आणि विहीत निरीक्षण शुल्क भरावे.

(२) परिच्छेद १च्या खंड (बी) अंतर्गत जनित्र संच कार्यान्वित केल्यानंतर संबंधित प्रभारी विद्युत अभियंता किंवा ग्राहकाचा किंवा धारकाचा प्राधिकृत अनुज्ञप्तीधारक विद्युत ठेकेदार याने असा संच कार्यान्वित केल्यापासून दोन महिन्यामध्ये सदर जनित्र संच, निरीक्षकाकडून निरीक्षण करून घेणे आवश्यक राहील.

(३) जर विशिष्ट उपकरण किंवा सामग्री यांची चाचणी घेतल्याचे उत्पादकाने प्रमाणित केल्याचे प्रमाणपत्र निरीक्षकास स्वीकारार्ह नसेल तर संबंधित निरीक्षक आवश्यकतेप्रमाणे अन्य अशा चाचण्या घेण्याचे, असा जनित्र संच धारण करणाऱ्याला किंवा ग्राहकास निदेश देईल.

(४) जर निरीक्षकाने भारतीय विद्युत नियम, १९५६ च्या नियम ५ च्या पोट नियम (४) अंतर्गत आदेश बजावले तर अशा आदेशाची, आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत परंतु कोणत्याही परिस्थितीत संच कार्यान्वित केल्यापासून तीन महिन्यांचे कालावधीत पुरवठादार, मालक किंवा धारक यांनी पूर्तता करणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वि. मा. बगाडे,**

शासनाचे अवर सचिव.

## INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 22nd November 2007

*NOTIFICATION*

INDIAN ELECTRICITY RULES, 1956.

No. IER. 2007/CR-76/NRG-3.— In exercise of the powers conferred by rule 133 of the Indian Electricity Rules, 1956, the Government of Maharashtra hereby, directs that the provisions of rule 47 A of the said rules shall not, subject to the conditions specified in the Schedule appended hereto, apply for installation and testing of generating units of a capacity exceeding of 10 kw but not exceeding 200 kw makes the following Rules namely :—

*Schedule*

(Conditions on which the provisions of rule 47A of the Indian Electricity Rules, 1956, shall not apply for installation and testing of generating units of a capacity exceeding 10 kw but not exceeding 200 kw.)

(1) The Electrical Engineer in-charge of the installation or an authorised Electrical Contractor of the consumer or occupier, as the case may be, who intends to commission his generating plant of a capacity exceeding 10 kw but not exceeding 200 kw shall :

(*a*) (*i*) perform all requisite tests of the generating set, record the results thereof ;

(*ii*) satisfy himself that it shall withstand the application for which it is intended to be used ; and

(*iii*) submit an application to the Inspector for approval of charging his installation, alongwith the results of the test specified in clause (*i*) and may also submit a self-signed certificate to the effect that such commission shall withstand the application for which it is intended to be used ;

*OR*

(*b*) after submitting an application for charging, as aforesaid, charge the installation and immediately inform in writing the Inspector the date of the charging and pay the requisite fee for the inspection ;

(2) if the installation is charged under clause (*B*) of paragraph 1, within a period of two months of such charging, the electrical engineer in charge of the installation or an authorised licensed electrical contractor of the consumer or occupier of the installation shall get such installation inspected from the Inspector.

(3) if the Inspector does not accept the certificate of the manufacture of any particular apparatus or equipment certifying the tests, he may direct the consumer of occupier of the installation to carry out such tests as he deems necessary.

(4) if the Inspector serves an order under sub-rule (4) of rule 5 of the India Electricity Rules, 1956, it shall be necessary for the supplier, owner or occupier to comply with the same within the period specified therein ; but in any case not later than three months from the date of charging the installation.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V. M. BAGADE,
Under Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई